# ग. भि. मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय, शेगाव

# ग्रंथालय विभाग

संत गजानन महाराज यांच्या पावन भूमितील शेगाव शिक्षण संस्था, शेगावचे ग. भि. मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय ग्रंथालय विभाग शैक्षणिक वर्ष २०२१ –२२ मधील अहवाल सादर करीत आहे. अहवाल वर्षात ग्रंथालय ग्रंथालयाच्यावतीने विविध उपक्रम राबवीले गेले. विद्यार्थ्यांसाठी व प्राध्यापक यांना ग्रंथालयाकडून देण्यात येणा–या सेवा सुविधा यांचाही परिचय वेळोवेळी करून देण्यात आला. मागील काही वर्षापासून ग्रंथालयात e-Resources वापर करण्यासाठी व त्याचा Accessss करणायासाठी सर्व विद्यार्थी व प्राध्यापक यांचे UGC INFLIBNET N-List मार्फत 7500+ संशोधन नियतकालीके व 350000+ ई–बुक उपलब्ध करून देण्यात आले. त्याचबरोबर उत्तम बुक्स संग्रह करण्यात आला

**भौतिक सुविधा–**

ग्रंथालयाची इमारत स्वतंत्र असून ती वेगवेगळ्या विभागात विभागली आहे. विद्यार्थी व प्राध्यापक यांना स्वतंत्र अभ्यास कक्ष आहे, मुलींसाठी स्वतंत्र वाचन कक्ष आहे. संदर्भ विभाग ज्यात दर्जेदार संदर्भ ग्रंथ संग्रहित केलेले आहेत. ग्रंथालय संगणकीकरनासाठी Dot.Com Amaravati Library Managemnt software वापरले आहे.

## अ. ग्रंथालय सल्लागार समिती

1. **अध्यक्ष – प्राचार्य, डॉ. ए. एल. राठोड**
2. सदस्य – डॉ. व्ही. एम. डेहनकर
3. सदस्य – डॉ. जी. डी. वाघ
4. सदस्य – डॉ. व्ही. के. गायकवाड
5. सदस्य – डॉ. व्ही. एन. इंगळे
6. सदस्य – प्रा. एस. व्ही. अग्रवाल
7. सचिव – प्रा. एन. ए. देवर

## ब. ग्रंथालयातील सेवा व सुविधा

| अ.क्र. | सेवा | अ.क्र. | सुविधा |
| --- | --- | --- | --- |
| 1 | ग्रंथ देवान घेवाण | 1 | संदर्भ विभाग |
| 2 | संदर्भ सेवा | 2 | नियतकालिका विभाग |
| 3 | नविन दाखल ग्रंथ | 3 | ई–रिसोर्सेस ॲक्सेस सेंटर |
| 4 | रेफरल सेवा | 4 | वाचन कक्ष सुविधा |
| 5 | ग्रंथसुची सेवा | 5 | वेब ओपॅक |
| 6 | वैयक्तिक सेवा | | |
| 7 | प्रतिलिपी सेवा | | |
| 8 | प्रचलित जागरूकता सेवा (CAS) | | |
| 9 | आंतर महाविद्यालयीन देवघेव | | |
| 10 | पोर्टल सेवा | | |
| 11 | इंटरनेट सेवा | | |
| 12 | वाय फाय सेवा | | |
| 13 | ऑनलाईन डॉक्युमेंट डिलिव्हरी बाय व्हाटसॲप | | |

## क. ग्रंथालयातील साहित्य संपदा

1. ग्रंथ – 16353 + 4729 English Medium Commerce
2. नियतकालिके – 12
3. वृत्तपत्रे – 7
4. मॅप – 2
5. सी.डी. – 25
6. ऑडीओ व्ही. – 4


## ड. ग्रंथालय विभागाव्दारे आयोजित उपक्रम

1. ग्रंथालय आणि शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 21.07.2021 रोजी सकाळी 7.00 वाजता रासेयो च्या वतीने जागतीक महामारी कोवीड 19 मुळे लॉकडाउन कालावधीमध्ये आंतराष्टीय योग दिवस विद्यापीठाच्या आदेशानुसार सर्व नियमांचे पालन करून ऑनलाईन घेण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे मार्गदर्शक व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिलकुमार राठोड उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना जिवनात योगाचे महत्व पटवून देवून या महामारीच्या काळात आपले आरोग्य कसे चांगले ठेवावे व व्यसनापासून परावृत्त राहण्यासाठी सर्वांना मार्गदर्शन केले.

तसेच यावेळी एका रासेयो स्वयंसेवकाने सर्वांना ऑनलाईन योगासने करून दाखविली.

यावेळी ऑनलाईन 45 रासेयो स्वयंसेवक तसेच महाविदयालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.






2. दि. 12 ऑगष्ट 2021 रोजी ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ शियाली रंगनाथन यांची जयंती **'ग्रंथपाल दिन'** उत्साहात साजरी करण्यत आली.



3. दि. 15/10/2021 रोजी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त **''वाचन पेरणा दिन''** साजरा करण्यात आला.



4. **"स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन"**

दि. 15/12/2021 रोजी ग्रंथालय विभागाच्यावतीने व श्री ज्ञानेश्वर मस्कुजी बुरूंगले महाविद्यालय शेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने **मार्गदर्शक डॉ. पी. सी. डाबरे**, जळगाव जामोद महाविद्यालय यांचा "स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन" या विषयावर एक दिवासीय मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला.







5. **''निबंध स्पर्धा'' आयोजन.**

दि. 04/10/2021 रोजी ग्रंथालय विभागाव्दारे सेठ ग. भि. मुरारका महाविद्यालय, शेगांव येथे **" भारताच्या स्वातंत्र लढयात महात्मा गांधींचे योगदान"** या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. **यावेळी 68 विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला.** पुरस्कार प्राप्त स्पर्धकांना प्रथम पुरस्कार 501 रूपये व्दितीय पुरस्कार 301/— व तृतीय पुरस्कार 201/— रूपये देण्यात आला. तसेच सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले






6. **सांमजस्य करार (MOU)**

श्री ज्ञा. म. बुरूंगले महविद्यालल, शेगाव येथील ग्रंथालयासोबत पुढील चार वर्षाकरीता दोन्ही ग्रंथालयातील वाचकांना व विद्यार्थ्यांना त्यांना हवा असलेला ग्रंथ किंवा वाचन साहित्य मिळावे हा हेतु साध्य करण्यासाठी ग्रंथालयांनी आपसात ग्रंथ देवघेव तसेच विविध आयोजित कार्यक्रमांचा लाभ विद्यार्थ्यांना व्हावा यासंदर्भात MOU केलेला आहे.

7. **कोविड–19 लसीकरण कार्यक्रम (पहिला लसीकरण कॅम्प)**

**दि. 11.10.2021** रोजी सेठ भि. मुरारका महाविद्यालय, शेगांव येथे शासन निर्देषानुसार **ग्रंथालय व रा.से.यो. विभागाव्दारे कोविड 19 लसीकरण कार्यक्रम** सोमवार रोजी आयोजित करण्यात आला. यावेळी शासनाने दिलेल्या निर्देषाचे पालन करून हा कार्यक्रम पार पाडण्यात **सईबाई मोटे शासकिय रूग्णालय, शेगाव यांच्या सर्व टीमचे तसेच मा. सोनवणे साहेब, तहसिलदार शेगाव यांचे मोलाचे सहकार्य लाभले.**

8. **कोविड–19 लसीकरण कार्यक्रम (दुसरा लसीकरण कॅम्प)**

**दि. 25.10.2021** रोजी सेठ भि. मुरारका महाविद्यालय, शेगांव येथे **मिशन युवा स्वास्थ अंतर्गत ग्रंथालय व रा.से.यो. विभागाव्दारे कोविड 19 लसीकरण कार्यक्रम** दुस–यांदा आयोजित करण्यात आला. यावेळी शासनाने दिलेल्या निर्देषाचे पालन करून हा कार्यक्रम पार पाडण्यात आला. **सईबाई मोटे शासकिय रूग्णालय, शेगाव यांच्या सर्व टीमचे मोलाचे सहकार्य लाभले.**

9. **कोविड–19 लसीकरण कार्यक्रम (तिसरा लसीकरण कॅम्प)**

**दि. 30.10.2021** रोजी सेठ भि. मुरारका महाविद्यालय, शेगांव येथे **मिशन युवा स्वास्थ अंतर्गत ग्रंथालय व रा.से.यो. विभागाव्दारे कोविड 19 लसीकरण कार्यक्रम शनिवार** रोजी तिस–यांदा आयोजित करण्यात आला. यावेळी शासनाने दिलेल्या निर्देशाचे पालन करून हा कार्यक्रम पार पाडण्यात आला. **सईबाई मोटे शासकिय रूग्णालय, शेगाव यांच्या सर्व टीमचे मोलाचे सहकार्य लाभले.**


20
राष्ट्रीय सेवा योजना पथक
REDMI NOTE 9 PRO MAX
CLICK BY DHIRAJ
2021/11/25 11:45


Shegaon
2022/01/12
ORIGINO


20
राष्ट्रीय सेवा योजना पथक